# पतसंस्थांना १५०० कोटी रुपयांचे 'पॅकेज' हवे

भारत सरकारने साखर कारखान्यांना १५०० करोड रुपयांचे 'पॅकेज' जाहीर करुन अंमलबजावणीची कार्यवाही सुरु आहे. महाराष्ट्राच्या वाट्याला ही रक्कम ५०० करोड रुपयांची आहे. जे साखर कारखाने आर्थिक अडचणीत आले त्यांची तीन भागात विभागणी करुन आजारी साखर कारखान्यांना आर्थिक अडचणीतून बाहेर काढुन '' ही सुधारण्यांची शेवटची संधी आहे'' असे जाहीर केले आहे.साखर कारखाने आजारी पडण्याची खरी कारणे सर्वांना चांगले माहित आहेत. त्या प्रकरणात येथे जाण्याची आवश्यकता नाही. दुष्काळ, कमी ऊस, कामगारांचे पगार, विजेची समस्या, भांडवलाची कमतरता ह्या कारणांमुळे कारखाने अडचणीत आले व वित्तीय संस्थांची देय रक्कम थकीत झाली. त्या बँकाही अडचणीत कारखान्यांमुळे आल्या. थकबाकी वाढली,एन.पी.ए.चे प्रमाण वाढले. रिझर्व्ह बँकेने त्या बँकांवर कारवाई चालु केली. संचालकांवर सहकार कायद्यान्वये थकबाकीचे दायित्व व अपात्रता ओढवण्याचे प्रसंग जवळ आले. लोकप्रतिनिधीही अडचणीत आले. विश्वासअर्हता संपायला आली. आणि एवढ्यात केंद्र सरकारने 'पॅकेज' जाहीर करुन सर्वांना वाचविले. कर्जावरील मागील व्याजदर सुध्दा १० टक्के पर्यंत आणले. कर्ज परतफेडीची मुदत ७ वर्षांवरुन १५ वर्षापर्यंत वाढविली. सर्व ठिकाणी आनंदी आनंद व कारखाने पुन्हा दिमाखाने समाजात आले. समारंभ झाले. चालक-मालक पुन्हा चांगल्या कारभाराबद्दल कारखान्यास  प्रशस्तीपत्रके, बक्षीसे मिळविण्यास पात्र झाली. गंगा पवित्र झाली. आणि आपणही सर्व अक्षरक्ष: धन्य झालो. म्हणून ज्या महाराष्ट्र राज्यात पतसंस्थांनी २५ हजार कोटींच्यावर कर्जवाटप केले, पतसंस्थांचे सभासद व कर्जदार-जामिनदार सुध्दा महाराष्ट्रातच रहातात. ह्या सर्वांना सुध्दा दुष्काळ, आपत्ती, नैसर्गिक आपत्ती, भुकंप, महापुर, खुली अर्थव्यवस्था, स्पर्धा,लागू आहेच आणि ह्यामुळे दिलेले कर्ज थकीत झाले. परिणामी ठेवीदारांच्या ठेवी व जिल्हा बँकांचे कर्ज परतफेड करण्यास प्रचंड अडचणी आल्या. पर्यायाने सर्वसामान्यांची चळवळ सहकार खात्याला हाताशी धरुन धनिकांच्या हातात जाण्यासाठी निरनिराळी परिपत्रके, जीआर, नव-नवीन संकल्पनांनी सर्वांना जेरीस आणले आहे. केंद्र सरकारचा 'आयकर' विभाग सुध्दा जागा केला गेला. इंकम टॅक्स रिटर्नचा ससेमिरा मागे लागला.सर्व बाजुंनी पतसंस्थांना कोंडीत पकडले आहे. दलाल-तथाकथित सर्व पक्षांची मक्तेदारी घेतलेले नेते-कार्यकर्ते 'सत्तेवरील पक्ष' हेच आपल्या मालकीचे दुकान आहे, असे प्रदर्शन करुन संपुर्ण राज्यभर ९९ टक्केपेक्षा जास्त पतसंस्थांना मेटाकुटीस आणुन १ टक्के धनिकांसाठी ही चळवळ चालविण्याची आग्रही कुटनिती सर्व स्तरावर चालु आहे. म्हणुन हे त्वरीत थांबविणे गरजेचे आहे. चोर व सन्यांसी  फरक समजेनासा झालेला आहे, ते उघड करण्याची गरज आहे. केवळ सत्ता आपणांस व

आपल्या कतृत्वहीन टाकाऊ लोकांना सत्तेत घेऊन संस्था ताब्यात ठेवण्यासाठी व घेण्यासाठी सत्तेचा दुरुपयोग खुलेआम चालु आहे. **'पैसा-सत्ता-मनुष्यबळ'** एकत्रीतरित्या नांदु लागले आहे. ह्याला एकच उत्तर आहे **'पतसंस्थांना पॅकेज'** हवे आहे. ते खालिलप्रमाणे -

१) थकबाकीदार कर्जदारांची परतफेडीची मुदत वाढ.

२) पतसंस्थांचा एन.पी.ए. महाराष्ट्र शासनाने/ केंद्र सरकारने खरेदी करावा व त्याची रक्कम त्या पतसंस्थांना द्यावी.

३) खरेदी केलेला एन.पी.ए. शासनाने वसुल करुन शासकीय तिजोरीत पुन्हा घ्यावी.

४) फरकाची रक्कम 'पॅकेजमधून' द्यावी.

५) पॅकेज १५०० कोटी रुपयांचे पतसंस्थांसाठी जाहीर करुन योजना आखावी.

विचार दिला. कृतीत आणण्यासाठी स्वाभिमानाने न घाबरता, लाचारीची लक्तरे फेकून देऊन पतसंस्थांनी मिळेल त्या ठिकानी उच्चार व मागणी करावी. वेळ पडल्यास न्याय देवतेकडे साकडे घालु या. **'पतसंस्थांना १५०० कोटी रुपयांचे पॅकेज मिळालेच पाहिजे.'**

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**